P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College,

44, Vidyanagari, Parvati, Pune - 411009.

## Unit Test - I (2025-26)

## Standard - X

Subject : Marathi | Marks : 20

Date : 08 | 08 | 2025 | Time : 9.40 am to 10.45 am

**प्र. १ खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत, पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.''

त्यांच्या बोलण्यातील उपरोधिक खोच माझ्याच नव्हे तर कोणाच्याही सहजपणे लक्षात येणारी होती. शाल व शालीनता यांचा संबंध काय? खरे तर, खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते! सुर्वे मुळातच शालीन, शालींच्या वर्षावाखाली त्यांची शालीनता कधी हरवली नाही, कधी क्षीणही झाली नाही.

मी कविवर्यांना म्हटले, ''शालीमुळे शालीनता येत असेल तर मी कर्जबाजारी होईन, भिकेला लागेन; पण शेकडो शाली खरेदी करून सर्वांना एकेक शाल लगेचच नेऊन देईन.'' यावर तो शालीन कवी मनापासून हसला.

शालीमुळे शालीनता येते की जाते? या प्रश्नाचे माझे उत्तर 'जाते' असेच आहे. सन्मान करण्याच्या रूपाने आपण खरे तर एक शालीन जग गमावून बसण्याचा धोका मोठा आहे.

मी २००४ साली मराठी साहित्य संमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो. तत्कालीन एक-दोन वर्षांत माझ्यावर शालींचा वर्षाव झाला. एवढ्या शाली जमत गेल्या, की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणेच शक्य नव्हते. मग मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले व त्या शाली वापरण्याचे वगैरे त्याला सर्वाधिकार दिले. बिचारा अतिप्रामाणिक! त्याच्याही छोट्या खोलीत त्याने ते सांभाळले.

हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या, गरीब श्रमिकांना!

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** (2)

| उताऱ्यात आलेली कविवर्य नारायण सुर्वेंची माहिती |
|---|
| |
| |

(1)

२) एका वाक्यात उत्तर लिहा.

१) लेखकाच्या मते शालीमुळे शालीनता येते की जाते?

३) स्वमत – तुम्ही एखाद्या गरजू व्यक्तीला कशाप्रकारे मदत कराल? याविषयी थोडक्यात लिहा. (2)

प्र.२ खालील अभंग वाचून दिलेल्या कृती पूर्ण करा.

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी ।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।
उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृपितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निववितां सर्वेंद्रियां ।।
मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।
अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।
तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।

१) खालील ओळींचे काव्यसौंदर्य लिहा. (2)

तैसे योगियाचे खालुते येणे । जे इहलोकी जन्म पावणे ।
जन निववी श्रवणकीर्तने । निजज्ञाने उद्धरी ।।

२) खालील शब्दांचे अर्थ लिहा. (1)

१) मधुरता –

२) इहलोकी –

३) स्वमत – 'योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे.' हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. (2)

प्र.३ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा. (4)

१) टीप लिहा – 'बार्क'

२) मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत असे तुम्हांस वाटते?

३) 'आधी केले मग सांगितले' या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.

प्र.४ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (1)

१) बिकट -

२) साखर -

आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (1)

१) खाजगी ×

२) उग्र ×

इ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा. (1)

१) टेबलावर <u>वह्या</u> होत्या.

ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा. (1

१) मैदानावर <u>मुले</u> खेळत होती.

उ) खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (2

१) अंगाचा तिळपापड होणे

२) निघण्याच्या बेतात असणे

३) आस्था वाटू लागणे

❖❖❖